
Shot on OnePlus

पाटण तालुक्यातील एक लहानसे टुमदार गाव हे गाव कराड - चिपळूण रस्त्यावर पाटण पासून चार किलोमीटर अंतरावर कोयना नदी तीरावर वसलेले असून श्री येडोबा देवाचे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे.

पाटण तालुक्याचा पश्चिमेला सह्याद्रीच्या कुशी मध्ये वसलेले हे तीर्थक्षेत्र आहे. तीर्थक्षेत्राच्या उत्तरेस पुरातन घेरादातेगड, दक्षिणेस किल्लेमोरगिरी (गुणवंतगड ) तर पश्चिमेस सह्याद्री पर्वतांच्या रांगा असून कोयनातीराच्या रम्य देवराईमध्ये श्री येडोबा देवाचे स्थान आहे. या ठिकाणाला 'बनपेठ' या नावाने सुद्धा ओळखले जाते. निसर्गरम्य देवराईमध्ये येडोबा मंदिर पूर्वाभिमुख आहे. मंदिराच्या सभामंडपामध्ये प्रवेश घेतल्यानंतर देवाच्या मूर्तीसमोर

दगडी नंदीची भव्य मूर्ती व कासव आहे. त्यामुळे श्री क्षेत्र येडोबा हे शिवमंदिराची साक्ष देते. मंदिराची मुळची धाटणी हेमांडपंथी, मूळ मंदिराची ग्रामस्थांनी कायापालट केला आहे. मंदिराला शोभेल असा भव्य कळस व सुसज्ज स

भामंडप बांधण्यात आला आहे.

मंदिरातील गाभाऱ्या मध्ये प्रवेश करताना दोन भल्या मोठ्या दगडी मूर्ती उभ्या आहेत. त्यांना 'रडवे' असे म्हणतात. त्याचा इतिहास सुद्धा फार मनोरंजक आहे - श्री येडोबा व देवी जोगेश्वरी यांच्या लग्नाच्या वेळी हे दोन भाऊ उपस्थित होते. लग्नाच्या वेळी मानपमानासाठी हे दोन भाऊ रुसून बसले होते. त्यांचे प्रतिक म्हणून मंदिरातील गाभाऱ्याच्या प्रवेशदारावरच दोन्ही बाजूला उभे असलेले रडवे त्याची साक्ष देतात.

मंदिराच्या गाभाऱ्यामध्ये मध्यभागी येडोबा दैवत ठाण मांडून बसलेले आहे. उजव्या बाजूला देवी जानुबाईची मूर्ती असून डाव्या बाजूस येडोबा देवाचे रक्षक उभा आहे.

गाभाऱ्यातील सभामंडपाच्या डाव्या बाजूला उतराभिमुख शिवलिंग आहे. मंदिराच्या उत्तरेस देवी जोगेश्वरी मंदिर आहे. या मंदिरामध्ये पुरातन काळातील अनेक दगडी मूर्ती ठेवलेल्या आहेत. येडोबा मंदिरापासून पूर्वेला काही अंतरावर कोपऱ्यात श्री नाईकबा देवाचे जीर्णोद्धार केलेले देवालय आहे. येडोबा देवालयाच्या मालकीची १३ एकर जमीन आहे. मंदिराच्या देवराईमध्ये अनेक प्रकारची पुरातन वृक्ष आहेत.

देवराई मुळे मंदिराचा परिसर निसर्गरम्य असून ऐन उन्हाळ्यामध्ये सुद्धा शांत, आल्हाददायक वातावरून असते. मंदिराच्या दक्षिणेस महाराष्ट्राला वरदान ठरलेली ' कोयना नदी ' संथ वाहते तर उत्तरेस कराड-चिपळूण महामार्ग आहे.

### भौगोलिक स्थान

येडोबा देवस्थान येराड महाराष्टातील तसेच कर्नाटकातील सर्वात लोकप्रिय आसलेले तसेच कोयना काठी वसलेले हे मंदिर आहे. या देवाचा इतिहास खूप मोठा व प्राचीन आहे. या देवाच्या दर्शना साठी लोकांची खूप गर्दी असते.या देवाची यात्रा एप्रिल (चैत्रपौर्णमेला) महिन्यात असते.लाखो भाविक या देवाच्या दर्शन साठी येतात.


Shot on OnePlus


श्री नाईकबा प्रसन्न








SHREE YEDOBA RAJA Y


@drone_shutter_

य

